# दैनिक वादळ वार्ता

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● गुरुवार दि.४ सप्टेंबर २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष ३ रे ● अंक २० ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Thrusday 4 Sep 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 3rd ● Issue 20 ● Pages 4 ● Rate 4 Rs


# तेरावा झाला मात्र न्याय नाही!

## एसपी साहेब, अजून किती दिवस थांबणार कारवाई?

## श्रीनाथ गीते आत्महत्या प्रकरणात आरोपी संस्थाचालक मोकाट



**बीड । बालाजी जगतकर**

बीड जिल्ह्यामधील परळी तालुक्यात नंदागौळ गावातील श्रीनाथ गोविंद गीते या तरुणाने आश्रम शाळेच्या संस्थाचालकांच्या मानसिक व शारीरिक छळाला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केली. घटनेला तेरा दिवस उलटले तरी पोलिसांनी आरोपींवर ठोस कारवाई करण्याचे धाडस दाखवलेले नाही, त्यामुळे पोलीस प्रशासनावरील विश्वास डळमळीत झाला आहे.

**गुन्हे दाखल... पण पोलिसांचा कारभार ढिसाळ!**

या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. ०३६९/२०२५ नुसार बीएनएस २०२३ चे कलम १०८, ३५१(२), ३५२ व ३(५) अंतर्गत संस्थाचालक उद्धव माणिक कराड व संजय परशुराम राठोड यांच्यावर गुन्हा दाखल आहे. मात्र अटक दूरचीच गोष्ट, प्राथमिक चौकशीसुद्धा अंधारात !

**चार जागा भरतीचा घोटाळा, लाखोंचा व्यवहार?**

घटनेच्या दिवशीच श्रीनाथ यांना अनुकंपा नियुक्तीचे आदेश मिळाले होते. पण त्याच दिवशी संस्थाचालकाने चार जागा बेकायदेशीरपणे भरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला. लाखो रुपयांचे व्यवहार झाले असल्याची चर्चा असून समाज कल्याण विभागातील अधिकारीही यामध्ये सामील असल्याचा आरोप आहे.

**आईच्या लढाईचा अंत दुःखद**

कर्करोगाने त्रस्त आईने मुलाच्या हक्काच्या नोकरीसाठी शासन दरबारी उपोषण करून लढा दिला. अखेर श्रीनाथला नियुक्ती मिळाली पण संस्थाचालकाने छळ सुरू केला आणि या छळाला कंटाळून त्याने टोकाचे पाऊल उचलले.

**पोलिस प्रशासनावर संशयाची छाया**

कुटुंबीयांनी पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे तातडीने कारवाईची मागणी केली. मात्र तेरा दिवस उलटूनही कारवाईचा ठसा नाही. कुटुंबाचा सवाल:

तेरावा पार पडला, पण आरोपी मोकाट! आई आजारी आहे... आमचं भविष्य कोण बघणार?

**ठाम मागणी**

कुटुंबीयांनी आवाज उठवला आहे: श्रीनाथ गीतेला आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या संस्थाचालकांवर तातडीने कठोर कारवाई व्हावी. पोलिसांचा ढिसाळ कारभार जनतेला मान्य नाही!




## अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने तहसील कार्यालयावर निदर्शने

**माजलगाव । परमेश्वर चांदणे**




अखिल भारतीय किसान सभा माजलगाव समितीच्या वतीने आज तहसील कार्यालयावर निदर्शने करण्यात आले यावेळी, मंजरथ-गंगामसला मंडळ अतिवृष्टी मधून वगळले आहे ते मंडळ तात्काळ अतिवृष्टी मधून अनुदान वाटप करावे व शेतकऱ्यांचे होल्ड केलेले सेविंग खाते तात्काळ ते होल्ड काढावे, सरकारने सातत्याने घेतलेली शेती व शेतकरी विरोधी भूमिका यामुळे अडचणीत आलेला, कर्जबाजारी झालेला शेतकरी वैफल्यग्रस्त झाला असून दिवसेंदिवस आत्महत्येचे सत्र वाढत आहे. त्यातच यावर्षी सातत्याने लागून असणाऱ्या पावसाने ओल्या दुष्काळ सदृश्य स्थिती निर्माण झाल्याने शेतात पाणी साचून, पाणी लागून अथवा शेत वाहून जाऊन मोठ्या प्रमाणात पिकांची व शेतीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या अडचणीत या परिस्थितीमुळे आणखीनच भर पडली असून त्यावर कडी म्हणून की काय, अमेरिकेच्या दबावाला बळी पडून केंद्र सरकारने कापसावरील आयात शुल्क हटवून शेतकऱ्यांच्या अडचणीत आणखी वाढ केली आहे. अमेरिकन सरकार सातत्याने भारतावर दबाव वाढवून शेती क्षेत्रात सोयाबीन, कापूस, दूध इत्यादी उत्पादने इथे खपवून भारतीय शेती व त्यावर अवलंबून असणाऱ्या लोकांचे रोजगार उध्वस्त करण्याचा डाव आखत आहे. तुर्तास अमेरिकेच्या यदाबापुढे भारताने कणखर भूमिका घेतल्याचे दिसून येत असले तरी कापसावरचे आयात शूल्क हटवून भारताने एकप्रकारे प्रतिसाद द्यायला सुरुवात केली आहे. सरकारकडून दबावाला बळी पडून कसलाही शेतकऱ्या विरोधातला निर्णय घेऊ नये म्हणून व या अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शेतकऱ्यांच्या खालील मागण्यासाठी दि. ०३ सप्टेंबर २०२५ रोजी तहसील कार्यालय माजलगाव येथे ११:३० -च् वाजता निदर्शने केली आहेत. तरी शासनाने तात्काळ मागण्याची पूर्तता करावी अन्यथा यापेक्षाही तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देत आहोत, यावेळी अखिल भारतीय किसान सभेचे तालुका अध्यक्ष कॉ.कृष्णा सोळंके, कार्याध्यक्ष कॉ. बाबा सर, कॉ.शिवाजी कुरे, कॉ. वसंत पाटील,कॉ. मोहन जाधव, कॉ. गणेश कदम, कॉ. सुदर्शन हिवरकर, कॉ.आबा राठोड, कॉ. रणवीर साखरे,प्रकाश सादोळकर,अरुण गरड, शरद नांदे, अनिल राठोड,सुरेश जाधव, विष्णू खेत्री,प्रभाकर खेत्री व शेतकरी सहभागी होते.

## तळोदा वाल्हेरी बसला भवर गावाजवळ अपघात, बस पलटी, ७० विद्यार्थी जखमी





**नंदुरबार । दिपक गोसावी**

दिनांक ३ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ६ ते ७ वाजेदरम्यान तळोदा तालुक्यातील भवर गावाजवळ वाल्हेरी बसचा भीषण अपघात झाला. या अपघातात बस पलटी झाल्याने सुमारे ८० विद्यार्थ्यांपैकी ७० विद्यार्थी किरकोळ जखमी झाले असून विद्यार्थ्यांना मुका मार बसला आहे. तीन विद्यार्थ्यांना पुढील उपचारांसाठी खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.बस क्रमांक एमएच ०६ एस ८६६१ वाल्हेरी येथून विद्यार्थ्यांना घेऊन तळोद्याकडे येत असताना भवर गावाजवळ तिचा अपघात झाला. अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी आणि प्रशासनाने तातडीने बचावकार्य सुरू केले. सुरुवातीला ३० ते ३५ विद्यार्थी जखमी झाल्याचा अंदाज होता, मात्र तळोदा येथील शासकीय रुग्णालयात वैद्यकीय तपासणीनंतर हा आकडा ७० वर पोहोचला.अपघाताची माहिती मिळताच आमदार राजेश पाडवी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी विद्यार्थ्यांची विचारपूस केली. त्यांचे स्वीय सहाय्यक किरण सूर्यवंशी आणि कलावती फाउंडेशन सहायता केंद्राचे संचालक योगेश मराठे यांनी देखील मदतकार्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. जखमी विद्यार्थ्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. प्रशासनाने केलेल्या जलद उपाययोजनांमुळे परिस्थिती नियंत्रणात आणली गेली.या घटनेमुळे पालक आणि नातेवाईकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. तळोदा येथील उपजिल्हा रुग्णालयाबाहेर पालकांनी, नातेवाईकांनी आणि शिक्षकांनी मोठी गर्दी केली होती. जखमी विद्यार्थ्यांवर योग्य उपचार केले जात असून, पोलीस पुढील तपास करत आहेत.

हा अपघात कसा झाला, याचा तपास पोलीस करत आहेत. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी बस चालकांनी आणि वाहतूक विभागाने अधिक खबरदारी घेणे गरजेचे आहे. विद्यार्थी सुरक्षित प्रवास करू शकतील यासाठी योग्य उपाययोजना करणे आवश्यक आहे.

# बीड पोलीसांची उल्लेखनिय कामगिरी

## ठार मारुन फरार झालेल्या आरोपीस १२ तासाचे आत केले जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरातील तुळजाई चौकात रात्रीं११:३० वा. चे सुमारास शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत महाराणा प्रताप चौक, बीड येथे इसम नामे अभिषेक राम गायकवाड व विजय सुनिल काळे यांचेत शुल्लक शाब्दीक वादा वरुन इसम नामे अभिषेक राम गायकवाड याने त्याचेकडे असलेल्या धारदार चाकुने विजय सुनिल काळे याचे डावे बाजुस छातीत वार करुन गंभीर जखमी करुन जिवानीशी ठार मारुन तो पळून गेला होता. सदर आरोपी विरुध्द सुनिल मारोती काळे वय ४७ वर्षे, व्यवसाय शिव जेन्टंस पार्लर चालक, रा. बाराभाई गल्ली धारुर ता धारुर जि.बीड ह.मु. स्वराज्य नगर, बार्शी रोड, बीड यांनी दिले फिर्यादी वरुन शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं. ४५२/२०२५ कलम १०३ बी.एन.एस.प्रमाणे गुन्हा दाखल झाला.त्यावेळी सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्याने सदर गुन्ह्याची तात्काळ दखल घेवुन गुन्हयातील फरार आरोपी अभिषेक राम गायकवाड याचा शोध घेणेकामी मा. वरिष्ठांचे आदेशान्वे पोलीस ठाणे शिवाजीनगर येथील चार पथक व स्थागुशा बीड येथील दोन पथक अशी वेगवेगळया पथके तयार करुन वेगवेगळया परिसरात शोध घेणेकामी रवाना केले होते. रात्रभर फरार आरोपीचा शोध घेत असतांना आरोपी अभिषेक राम गायकवाड हा काकडहिरा ता. पाटोदा जि.बीड शिवाराचे परिसरात डोंगरात दबा धरुन बसल्याची गोपनीय माहिती मिळल्यावरुन सदर ठिकाणी तात्काळ पथक रवाना करुन सदर आरोपीचा मोठ्या शिताफीने व कसोशीन डोंगर दऱ्यात शोध घेवुन तो पळुन जात असतांना डोंगरामध्ये त्याचा पाठलाग करुन त्यास ताब्यात घेवुन गुन्ह्यात अटक केली आहे.सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनित कॉंवत साहेब, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बीड श्री. हनपुडे पाटील साहेब यांचे मार्गदर्शनाखाली शिवाजीनगर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक श्री. किशोर पवार, स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. शिवाजी बंटेवाड, सहा. पोलीस निरीक्षक विलास मोरे, संदिप दुनगहु, गजानन क्षिरसागर, ग्रेडपोउपनि/ वासुदेव मिसाळ, पोहवा/ १६६४ रवी आघाव, पोहवा/५६२ भास्कर केंद्रे, पोना/१२४४ संतोष राऊत, पोहवा/५१ माने, मपोह/ अनिता खरमाटे, पोना/४७० ज्ञानेश्वर मराडे, पोशि/२०७७ बाळु रहाडे, पोशि/३०५ दिलीप राठोड, पोशि/ ६१७ अशोक राडकर, पोशि/ ४८५ विलास कांदे, पोशि/१३८५ राजेभाऊ जाधव, पोशि/ ७७७ लादे, पोशि/२७३ नवनाथ डाके, पोशि/९०४ लिंबाजी महानोर, पोशि/१९३ अमोल लोंढे व स्थागुशा, बीड येथील पोहवा/१६२६ राहुल शिंदे, पोहवा/७३२ दिपक खांडेकर यांनी केली आहे.

## लातूर जिल्हा प्रतिनिधीपदी सय्यद नदीमउल्ला समीउल्ला पटेल यांची निवड

**लातूर । प्रतिनिधी**



महाराष्ट्रात अल्पावधीतच लोकप्रियता मिळवणाऱ्या 'दैनिक वादळ वार्ता' या वृत्तपत्राच्या लातूर जिल्हा प्रतिनिधीपदी सय्यद नदीमउल्ला समीउल्ला पटेल यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या पत्रकारितेतील परिश्रम, सामाजिक भान आणि सत्यनिष्ठ वृत्तीचा सन्मान म्हणून ही जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे.सय्यद नदीमउल्ला पटेल यांनी यापूर्वी स्थानिक पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय राहून विविध सामाजिक प्रश्नांवर भरीव प्रकाश टाकला आहे. त्यांच्या या निवडीबद्दल पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.


'दैनिक वादळ वार्ता'च्या संपादक मंडळाने आशा व्यक्त केली आहे की, लातूर जिल्ह्यातील बातम्या प्रभावीपणे पोहोचवून पत्रकारितेच्या प्रामाणिक परंपरेला ते अधिक बळ देतील.

## आज संपूर्ण महाराष्ट्रासाठी सोन्याचा दिवस भावना व्यक्त करताना जरांगेंना अश्रू अनावर

**मुंबई (वृत्तसंस्था)**-संपूर्ण महाराष्ट्रासाठी विशेषतः मराठवाड्यासाठी आज सोन्याचा दिवस आहे. माझ्या समाजाचे कल्याण झाले. हा माझ्या समाजासाठी सुवर्णक्षण असून आज दिवाळी साजरी करा, अशा शब्दात मनोज जरांगे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत. मराठा आरक्षणासाठीचा शासन निर्णय आल्यानंतर मनोज जरांगे यांनी उपोषण मागे घेतले. तसेच यावेळी मनोज जरांगे भावुक झाल्याचे पाहायला मिळाले.मराठा उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटलांनी आधी मसुदा दिला व त्यानंतर एक तासात जीआर देखील आला. यावेळी मनोज जरांगे यांनी व्यवस्थित पडताळून जीआर वाचले. तसेच वकिलांच्या मार्फत सुद्धा सगळे जीआर व्यवस्थित तपासून घेतले. तसेच मागच्या ७५ वर्षात विजय झाला नसेल असा विजय मराठ्यांचा झाला आहे, असे जरांगे यांनी म्हटले. यावेळी मराठा बांधवांनी 'पाटील.. पाटील' अशा घोषणाबाजी देखील केल्या.मनोज जरांगे यांनी उपोषण सोडल्यानंतर मराठा बांधवांनी गुलाल उधळत आनंदोत्सव साजरा केला.

संपादकीय

# शहरांमधील भयाच्या सावल्या



सार्वजनिक ठिकाणी होणारी छेडछाड ही देखील चिंतेची बाब आहे. महिलांना रस्त्यांवर आणि सार्वजनिक वाहतुकीमध्ये हे अनुभव येतातच; मात्र आपल्याकडे असलेल्या पीडितेलाच दोष देण्याच्या प्रवृत्तीमुळे या घटनांची तक्रार करायलाही कुणी पुढे येत नाही. त्यामुळे तीनांतल्या दोन महिला याबद्दल बोलत नाहीत, हे अहवालातील निरीक्षण बोलके आहे.

आपल्या शहरात राहणे, वावरणे सहज आणि सुरक्षित वाटायला हवे, ही जगात कोणत्याही शहरात राहणाऱ्या नागरिकाची अगदीच प्राथमिक अपेक्षा असणे स्वाभाविक आहे; पण भारतीय शहरांमध्ये राहणाऱ्या सर्व महिलांची मात्र ही भावना नाही. तब्बल ४० टक्के महिलांना त्यांची शहरे सुरक्षित वाटत नाहीत, हे धक्कादायक वास्तव 'महिला सुरक्षेवरील राष्ट्रीय वार्षिक अहवाल आणि निर्देशांक (छ-ठख) २०२५' मधून समोर आले आहे.देशातील ३१ महत्त्वाच्या शहरांमधील १२,७७० महिलांचे सर्वेक्षण करून काढलेले हे निष्कर्ष आहेत. राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्ष विजया रहाटकर यांनी हा अहवाल जाहीर करताना केलेले वक्तव्य महत्त्वाचे आहे. त्या म्हणतात त्याप्रमाणे, महिलांची सुरक्षा हा केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नाही तर स्त्रीच्या जगण्याच्या प्रत्येक पैलूवर परिणाम करणारा मुद्दा आहे. त्यामध्ये शिक्षण, आरोग्य, कामाच्या संधी, वावरण्याचे स्वातंत्र्य या सर्व गोष्टी येतात. ६० टक्के महिलांच्या मनातील सुरक्षित असल्याची भावना आणि अन्य ४० टक्के महिलांना वाटणारे असुरक्षिततेचे भय यांतील मोठे अंतर पार करण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे.

या सर्वेक्षणात समोर आलेली सगळ्यांत महत्त्वाची बाब म्हणजे सूर्यास्तानंतरची स्थिती. रात्रीच्या वेळी मनोरंजनाची ठिकाणे आणि सार्वजनिक वाहतुकीची साधने वापरताना बहुतांश महिलांना असुरक्षित वाटते. आयटी उद्योग, वैद्यकीय क्षेत्र, माध्यमे, मनोरंजन, हॉटेले यांसह अनेक क्षेत्रांत महिलांना रात्री काम करावे लागणे ही आता सामान्य बाब झाली आहे. बहुतांश महिलांना कामाच्या ठिकाणी सुरक्षित वाटते, ही समाधानकारक बाब असली तरी घरी परतण्याची वाटही तेवढीच सुरक्षित असावी, हे मात्र अद्याप घडलेले नाही.महिलांना जी शहरे सुरक्षित वाटतात, त्यात राज्याची राजधानी मुंबई अग्रक्रमावर आहे; याचे कारण मुंबईची जीवनवाहिनी असलेल्या लोकल ट्रेनमध्ये महिलांच्या डब्यात आणि रेल्वे स्थानकांवर रात्रीच्या वेळी असलेली पोलिसांची उपस्थिती. मध्यरात्रीनंतरही महिलांच्या डब्यांत निर्धास्तपणे प्रवास करणाऱ्या महिला दिसतात, ते यामुळे. पाटणा, जयपूर, फरीदाबाद, दिल्ली, कोलकाता, श्रीनगर, रांची या असुरक्षित शहरांच्या यादीत राजधानी दिल्लीचे नाव असावे, ही केवळ देशाच्याच नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर निश्चितच नाचक्कीची बाब.शहरांतील ९१ टक्के महिलांना कामाची ठिकाणे सुरक्षित वाटतात, हे दिलासादायक आहे, पण त्यापैकी जवळपास अर्ध्या महिलांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरोधात कायदा (पॉश) आहे याची जाणीवच नसावी, हे अत्यंत निराशाजनक आहे. या कायद्याबाबत पुरेशी जाणीवजागृती करूनही शिकलेल्या आणि कमावत्या महिलांना याची किमान माहितीही नाही, हे केवळ खेदजनकच नव्हे तर बेजबाबदारपणाचे आहे. ज्या महिलांना या कायद्याबद्दल माहिती होती, त्यांनीही अशा तक्रारींची दखल घेतली जाईल याबद्दल साशंक असणे, हेही चिंताजनक आहे. सध्याची यंत्रणा अशा तक्रारींची दखल घेण्यात संपूर्ण अपयशी झाल्याचे ३० टक्के महिलांचे मत आहे.सार्वजनिक वाहतुकीत महिला पोलिसांची उपस्थिती असते. अनेक शहरांमध्ये प आधारित टॅक्सीसेवांत महिला चालक आहेत. अनेक राज्यांमध्ये आता पोलिस दलात ३३ टक्के महिला आहेत. त्यांच्या सार्वजनिक ठिकाणी गणवेशातील उपस्थितीनेही बराच फरक पडतो. गेल्या काही वर्षांमध्ये शहरांमध्ये सीसीटीव्हीही मोठ्या प्रमाणात लावले गेले आहेत, महिलांना त्वरित मदत मिळावी म्हणून वेगवेगळ्या हेल्पलाइन असतात; मात्र, या हेल्पलाइनचा वापर नेमका किती केला जातो आणि केल्यास त्यावर किती त्वरेने प्रतिसाद मिळतो, याचेही देशव्यापी सर्वेक्षण होण्याची गरज आहे.या सर्वेक्षणाचे प्राधान्य शारीरिक सुरक्षेला आहे. पण महिलांना मानसिक, आर्थिक आणि डिजिटल सुरक्षाही हवी आहे. घर आणि कामाच्या ठिकाणी होणारा मानसिक छळ, वेतनातील स्त्री-पुरुष भेदभाव आणि आजच्या युगाचा मंत्र असलेल्या सायबर स्पेस यांमध्येही महिलांना सुरक्षा हवी आहे. ही जबाबदारी सरकारवर टाकून मोकळे होता येणार नाही. लैंगिक समानतेवर विश्वास ठेवणारा आणि तसे वागणारा समाज म्हणून आपण कुठे आहोत, याचे आत्मपरीक्षणही गरजेचे आहे. महिलांना समान अधिकार आणि स्वातंत्र्य देणाऱ्या ईशान्य भारतातील कोहिमा, ऐजॉल, गंगटोक, इटानगर ही छोटी शहरे सुरक्षित शहरांच्या यादीत अग्रक्रमावर आहेत, हे पुरेसे बोलके आहे.

# विकसित उद्योगांची संकटांशी झुंज

दक्षिण महाराष्ट्रातील सातारा, कोल्हापूर आणि सांगली हे जिल्हे एकेकाळी औद्योगिक प्रगतीसाठी देशात आदर्श मानले जात होते. साखर कारखाने, दूध सहकारी चळवळ, कोल्हापूरचे फाऊंड्री व टेक्स्टाईल उद्योग, सांगलीची हळद-द्राक्षे यामुळे हा भाग राज्याच्या औद्योगिक नकाशावर ठळकपणे दिसत होता. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. शासन नवी मुंबई, विदर्भ, मराठवाडा येथे नवे विमानतळ, बंदरे आणि उद्योगधंद्यांच्या घोषणा करत आहे. पण आधीपासून उभारलेल्या औद्योगिक वसाहतींना पायाभूत सुविधाही न मिळाल्याने त्या धापा टाकायला लागल्या आहेत. राज्यात गुंतवणूक वाढत असल्याच्या घोषणा करत असताना दक्षिण महाराष्ट्रातील विकसित उद्योग मात्र अनेक संकटांनी झुंजत आहे. त्यात अमेरिकन टॅरिफमुळे कोल्हापूर, इचलकरंजी, सांगलीच्या उद्योगाला जोराचा झटका बसण्याची चिन्हे आहेत. अशा काळात शासनाचा किंवा उद्योग विभागाचा या उद्योजकांशी सुसंवाद आहे असे म्हणण्याचे धाडस कोणीही करणार नाही. हे सत्यच आहे की, दक्षिण महाराष्ट्रातील उद्योग व्यवसाय हे सरकारी मदतीपेक्षा या भागातील नेतृत्वाच्या दूरदृष्टीमुळे निर्माण झालेले आहे. कोल्हापुरात राजर्षी शाहू महाराजांसारख्या द्रष्ट्या राजाने या भागाला विकासाची दृष्टी दिली. प्रचंड औद्योगिक प्रगतीचे स्वप्न दाखवले आणि आपल्या हयातीत त्याची सुरुवात करून दिली. औंधसारख्या भागात प्रतिनिधींनी राबवलेल्या धोरणाने किर्लोस्करवाडीची जडणघडण झाली. महाराष्ट्राच्या स्थापनेनंतर यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक संस्कृती या भागात विकसित केली आणि स्वयंप्रेरणेने तसे कार्य करण्यास इच्छुक असणाऱ्या स्वातंत्र्य सैनिक तसेच युवा उद्योमशील अशा राष्ट्रवादी विचाराच्या युवकांना अशा उद्योगांची पायाभरणी करण्याची जबाबदारी सोपवली. सहकाराच्या जोडीने इथे साखर




कारखानदारी, सूत गिरणी, बँक, दूध संघ आणि शिक्षण संस्था असे सहकाराचे जाळे उभे राहिले, पुढे कुक्कुटपालनापासून कृषी मालक प्रक्रियेपर्यंतचे अनेक उद्योग छोट्या छोट्या शेतकरी कुटुंबातील लोकांनी उभे केले. इचलकरंजीत अशाच पद्धतीने वस्त्रोद्योगाचे जाळी निर्माण झाले. पण आजची स्थिती या सर्व उज्ज्वल इतिहासावर काजळी बसवणारी आहे. तरीही काही मंडळींच्या धडपडीमुळे आजही दक्षिण महाराष्ट्र आपले अस्तित्व राखतोय.

साताऱ्याला कोयना प्रकल्प आणि साखर उद्योगांचा वारसा आहे. कराड आणि साताऱ्यात दुग्ध व अन्नप्रक्रिया क्षेत्रात क्षमता आहे. कोल्हापूरमध्ये फाऊंड्री, टेक्स्टाईल आणि ऑटोमोबाईलचे मोठे केंद्र उभे राहिले आहे. येथे उद्योगांची विविधता आहे. सांगलीत एमआयडीसीमध्ये संरक्षण दलासाठी लागणाऱ्या वस्तूंपासून वाहन उद्योगातील छोटे पार्ट आणि कापड उद्योगात गती घेतलेली आहे. पूर्वी साखर कारखान्या पाठोपाठ हळद, द्राक्षे व ज्वारीवर आधारित लघुउद्योगांनी ओळख मिळवली. आज अनेक कारखाने कर्जात आहेत, फाऊंड्री उद्योग कच्च्या मालाच्या महागाईने व पर्यावरणीय अटींनी दबलेले आहेत, तर सांगलीत वीज आणि डिजिटल नेटवर्कचा अभाव आहे. फलटण एमआयडीसी गेली पाच वर्षे जमीन व पर्यावरण मंजुरीच्या फेऱ्यात अडकले आहे. कोल्हापूरच्या शिरोली एमआयडीसीमध्ये वीज आणि पाणीटंचाई ही कायमची समस्या झाली आहे. सांगलीच्या कुपवाड औद्योगिक वसाहतीत रस्ते व ड्रेनेजसारख्या मूलभूत सोयींचा अभाव असून उद्योजकांचा उत्साह कमी झाला आहे. अशा रखडलेल्या प्रकल्पांमुळे रोजगारनिर्मिती थांबली आहे. एमआयडीसीच्या नव्या वसाहतींच्या घोषणा सातारा, कोल्हापूर व सांगलीसाठी झाल्या आहेत. कागल-हातकणंगले एमआयडीसीमध्ये टाटा टेक्नॉलॉजीज आणि ह्युंदाईचे प्रकल्प मंजूर झालेत, ज्यामुळे हजारो रोजगार निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. सांगलीत फूड प्रोसेसिंग पार्क, कराड एमआयडीसीमध्ये लघुउद्योग प्रोत्साहनाच्या योजना कागदावर आहेत. पण व्यवहारात या योजनांना संथ गती आहे. नवी मुंबईत आंतरराष्ट्रीय विमानतळ, विदर्भात मोठे औद्योगिक हब, मराठवाड्यात नवीन उद्योग आणि दुसरीकडे दक्षिण महाराष्ट्रात आधीपासून वसवलेल्या वसाहती दुर्लक्षित - हा विसंवाद ठळक आहे. उद्योजक स्पष्टपणे सांगतात, आम्हाला विमानतळ वा बंदर नको, पण आधीच्या वसाहतींना साधे रस्ते, पाणी, वीज द्या. करसवलती, जीएसटीत सूट, जमीनवाटप जलद व पारदर्शक पद्धतीने व्हावे. प्रकल्प मंजुरीसाठी खऱ्या अर्थाने 'एक खिडकी योजना' लागू व्हावी. तसेच स्थानिक युवकांसाठी आयटीआय व पॉलिटेक्निक केंद्रांचा विस्तार व्हावा, कौशल्याधारित प्रशिक्षण मिळावे. महाराष्ट्राचे जीएसटी संकलन २०२३-२४ मध्ये २.५ लाख कोटी रुपये झाले. त्यात मुंबई, पुणे, ठाणे यांनी तब्बल ६५% वाटा उचलला. पश्चिम महाराष्ट्राचा वाटा ५-७% म्हणजे १२-१५ हजार कोटी रुपये आहे. एकेकाळी राज्याला औद्योगिक गती देणारा हा भाग आज मागे राहिल्याचेच हे आकडे सांगतात. आज राज्य शासन एका भागाला - मुंबई, पुणे, विदर्भ - मोठी झेप देत असताना, पूर्वी पुढारलेल्या पश्चिम महाराष्ट्राकडे दुर्दैवाने दुर्लक्ष होत आहे. सध्या वसलेल्या औद्योगिक वसाहतींना जर साधी पायाभूत सुविधा दिली नाही, तर त्या वसवलेल्या वसाहती ओस पडत जातील. दक्षिण महाराष्ट्राच्या उद्योगांमध्ये अद्यापही क्षमता आहे, फक्त शासनाच्या ठोस धोरणाची, पारदर्शक अंमलबजावणीची आणि मूलभूत सुविधांच्या विकासाची गरज आहे. अन्यथा एकेकाळी राज्याच्या औद्योगिक प्रगतीला गती देणारा हा भाग, उद्या केवळ इतिहासापुरता उरेल. दक्षिण महाराष्ट्राला पुन्हा औद्योगिक नकाशावर आणण्यासाठी काही उपाय आवश्यक आहेत. ते म्हणजे कोल्हापूर व सांगली येथे लॉजिस्टिक हब, महामार्ग व रेल्वे जोडणी. फूड प्रोसेसिंग, आयटी व नवीकरणीय ऊर्जा प्रकल्पांना करसवलती व अनुदान. पीपीपी मॉडेलवर रखडलेले प्रकल्प पूर्ण करणे. साखर उद्योगांचे आधुनिकीकरण करून इथेनॉल व बायोगॅस प्रकल्पांना प्रोत्साहन देणे. स्थानिक तरुणांना उद्योगासाठी तयार करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रांची स्थापना.

# उद्योगस्नेहाची वाट


रुपयाने गाठलेला तळ आणि अमेरिकेच्या आयातशुल्कामुळे निर्माण झालेल्या चिंतेच्या वातावरणातही महाराष्ट्रात सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार होण्यामुळे, आजही विविध क्षेत्रांतील उद्योगांची महाराष्ट्राला पसंती असण्यावर शिक्कामोर्तब झाले आहे.या कंपन्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक्स, औषधनिर्मिती, सौरऊर्जा, इलेक्ट्रिक बस आणि संरक्षण साहित्यनिर्मिती अशा क्षेत्रांतील कंपन्यांचा समावेश असून, यातून ३३ हजार रोजगारांच्या निर्मितीची आशा आहे. ग्रॅफाइट इंडिया आणि सीरम ग्रुप ऑफ कंपनीज यांच्यासह युरोबस भारत, आर्सेलर मित्तल, बीएसएल सोलर अशा देशी-विदेशी कंपन्यांनी हे करार केले आहेत. विशेषत: मुंबई, पुणे व नाशिक या भागातच उद्योगांचे केंद्रीकरण झालेले असताना या कंपन्यांनी अन्य भागांमध्येही केंद्रे सुरू करण्याची तयारी दर्शविणे, ही संतुलित विकासासाठी आशादायक बाब ठरते.ही सगळी गंमत वाटतेय का? एकमेकांवर गंभीर आरोप, घटस्फोटानंतर एकमेकांसोबत रोमॅन्टिक फोटो...सेलिब्रिटी कपल नेटकऱ्यांच्या निशाण्यावर



वाढवण बंदर, समृद्धी महामार्ग आणि नवी मुंबई विमानतळासारख्या प्रकल्पांमुळे राज्यातील पायाभूत सुविधांबाबत आशादायक चित्र निर्माण झाले आहे. त्या पार्श्वभूमीवर उत्तर महाराष्ट्रातील नाशिक, नगर व नंदुरबारमध्ये दहा हजार कोटी रुपये, पुणे विभागात १२ हजार कोटी रुपये, विदर्भात नागपूर, गडचिरोली आणि चंद्रपूरमध्ये ११ हजार कोटी रुपये आणि रायगडमध्ये तीन हजार कोटी रुपयांची गुंतवणूक या जिल्ह्यांच्या विकासाला नक्कीच हातभार लावेल. सरकारने सुरू केलेल्या 'मैत्री पोर्टल'चा उल्लेख करून, या उद्योगांना सुलभ परवानग्यांसह जमीन व पायाभूत सुविधा देण्याची हमी मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. या आघाडीवर आणखी गतीने काम होण्याची गरज आहे. परवान्यांचे जंजाळ आणि लालफीतशाही दूर करण्याची आवश्यकता आहे.रस्ते, वीज आणि पाण्यासारख्या पायाभूत सुविधांबाबत अनेक जिल्ह्यांतील चित्र समाधानकारक नाही. स्थानिकांचा विरोध दूर करण्यासाठी सामंजस्याची आणि संघटित माफियांना रोखण्यासाठी कठोर धोरणे कृतीतून दिसली, तरच उद्योगांमध्ये महाराष्ट्राबाबतचा विश्वास दृढ होणार असून, एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने ते महत्त्वाचे आहे.दुसरीकडे अमेरिकी डॉलरच्या तुलनेत रुपयाने आजवरचा नीचांक गाठण्यासारख्या चिंता साऱ्या देशाला सतावत आहेत. अमेरिका व चीनच्या आक्रमक धोरणांमुळे निर्माण झालेल्या स्थितीतून मार्ग काढून व्यापारतूट भरून काढण्यासाठी नवनव्या बाजारपेठा शोधणे, ही काळाची गरज आहे; त्यात महाराष्ट्र नक्कीच सिंहाचा वाटा उचलेल.

# हृदयात ब्लड क्लॉट का होतात? सुरुवातीला कोणती लक्षणे जाणवतात

रक्ताची गाठ जमणे ही एक अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये रक्त घट्ट होऊन जमा होऊ लागते. ज्या लोकांना मुंग्या येणे, बधिरपणा जाणवणे किंवा दुखणे जाणवते, त्यांच्यामध्ये रक्ताच्या गाठ होण्याची शक्यता असते. ही समस्या बहुतांश वेळा पायांच्या रक्तवाहिन्यांमध्ये दिसून येते, परंतु अनेक कारणांमुळे ती शरीराच्या इतर अवयवांमध्येही होऊ शकते. हृदयात रक्ताच्या गाठ झाल्याने हृदय निकामी होणे किंवा हृदयविकाराचा झटका यासारख्या गंभीर समस्या उद्भवू शकतात.हृदयात रक्ताची गाठ तयार होण्याची स्थिती खूपच दुर्मीळ आहे. फार कमी लोकांमध्ये ही समस्या दिसून येते. या स्थितीत हृदय निकामी होण्याचे कारण गाठीमुळे रक्ताचा सामान्य प्रवाह थांबणे आणि हृदयापर्यंत ऑक्सिजन कमी पोहोचणे. यामुळेच रक्ताच्या गाठी हृदयविकाराचा झटका, स्ट्रोक यासारख्या जीवघेण्या आजारांना कारणीभूत ठरू शकतात. पण प्रश्न असा आहे की, या गाठी का तयार होतात आणि त्याची सुरुवातीची लक्षणे कशी ओळखावी?



**खाण्यापिण्याची आणि अस्वास्थ्यकर जीवनशैली**

अपोलो रुग्णालयातील हृदयरोग तज्ज्ञ डॉ. वरुण बंसल सांगतात की, खराब खाण्यापिण्याची सवय आणि अस्वास्थ्यकर जीवनशैली ही रक्ताच्या गाठी तयार होण्याची सर्वात मोठी कारणे आहेत. जास्त तेलकट, जंक फूड आणि गोड पदार्थ खाल्ल्याने रक्तातील कोलेस्टरॉल वाढते आणि रक्तवाहिन्यांच्या भिंतींवर चरबी जमा होऊ लागते. हळूहळू रक्ताचा प्रवाह खंडित होऊ लागतो आणि गाठी तयार होण्याची शक्यता वाढते. एवढेच नाही, धूम्रपान आणि मद्यपानामुळेही रक्त घट्ट होते, ज्यामुळे रक्त सहज गाठ बनवते.

**शरीर निष्क्रिय ठेवणे**

दीर्घकाळ बसून काम करणे किंवा शरीर निष्क्रिय ठेवणे यामुळेही रक्ताभिसरण मंदावते. यामुळे रक्त रक्तवाहिन्यांमध्ये अडकू शकते आणि गाठ तयार होऊ शकते. याशिवाय मधुमेह, उच्च रक्तदाब, लठ्ठपणा, हार्मोनल असंतुलन आणि हृदयरोग यासारख्या आजारांमध्येही रक्ताच्या गाठी तयार होण्याचा धोका जास्त असतो. डिहायड्रेशन म्हणजेच शरीरात पाण्याची कमतरता यामुळेही रक्त घट्ट होते आणि यामुळे गाठी तयार होण्याची शक्यता वाढते.

**रक्ताच्या गाठीची लक्षणे कोणती?**

डॉ. वरुण सांगतात की, हृदयात रक्ताची गाठ तयार झाल्यावर शरीर अनेक संकेत देते, ज्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. सर्वात सामान्य लक्षण आहे छातीत दुखणे किंवा दबाव. अचानक छातीत जळजळ, जडपणा किंवा टोचल्यासारखे वाटणे हे रक्ताच्या गाठीचे संकेत असू शकतात. याशिवाय श्वास फूलणे, थोड्याशा मेहनतीनंतरही थकवा किंवा श्वास घेण्यास त्रास होणे हे देखील याचे लक्षण आहे.

**हृदयात गाठ तयार होण्याची गंभीर लक्षणे**

हृदयाची धडधड अनियमित होणे, काम नसतानाही थकल्यासारखे वाटणे आणि अचानक थंड घाम येणे हे देखील हृदयात रक्ताची गाठ तयार होण्याचे संकेत असू शकतात. काहीवेळा रुग्णाला चक्कर येऊ शकते किंवा बेशुद्धही होऊ शकतो, कारण रक्ताच्या गाठीमुळे मेंदूपर्यंत रक्तपुरवठा कमी होतो. जर गाठ पायांच्या रक्तवाहिन्यांमध्ये असेल आणि हृदयाकडे सरकत असेल तर पायांमध्ये दुखणे किंवा सूज देखील दिसू शकते.

जर यापैकी कोणतीही लक्षणे वारंवार दिसून आली तर ती हलक्यात घेऊ नका. तात्काळ डॉक्टरांकडून तपासणी करून घ्या, कारण हे हृदयात रक्ताच्या गाठीचे सुरुवातीचे संकेत असू शकतात. वेळीच उपचार केल्यास गंभीर परिस्थिती टाळता येऊ शकते. हृदयात रक्ताची गाठ तयार होणे ही कोणतीही सामान्य समस्या नाही.

**कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी?**

असंतुलित खाण्यापिण्याची सवय, धूम्रपान, लठ्ठपणा आणि इतर आजार ही याची मोठी कारणे आहेत. याची लक्षणे वेळीच ओळखणे आणि डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. निरोगी आहार, नियमित व्यायाम, पुरेसे पाणी आणि तणावापासून दूर राहणे यामुळे हृदय दीर्घकाळ निरोगी राहू शकते.

# मराठा समाजाच्या कल्याणासाठी फडणवीस एकनाथ शिंदे यांनी सर्वाधिक काम केले

## 'अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळा' चे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांचे प्रतिपादन

## सध्याचे आंदोलन हे माथी भडकावल्यामुळे केवळ व्यक्तिविरोधी आंदोलन

**मुंबई । प्रतिनिधी**

शरद पवारांनी बंद केलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाची पुनर्स्थापना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ - १९ या काळात केली. मराठा समाजाच्या तरूण पिढीचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी सर्वाधिक निधी, योजना, कामे ही देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पुढाकाराने झाली असताना मराठा समाजातील तरुणांची माथी भडकावून आपला राजकीय स्वार्थ साधण्याचे हीन दर्जाचे राजकारण सध्या विरोधकांकडून केले जात असल्याची घणाघाती टीका अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सोमवारी केली. मराठा आंदोलनाची दिशा भरकटली असून सध्याचे आंदोलन हे केवळ व्यक्तिविरोधी आंदोलन झाले आहे. ज्यांनी मराठा समाजाच्या उन्नतीसाठी सर्वाधिक काम केले त्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांविरोधातील हे आंदोलन झाले आहे असेही श्री. पाटील यांनी नमूद केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान उपस्थित होते.

यावेळी श्री. पाटील यांनी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना मराठा समाजासाठी सुरु करण्यात आलेल्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. श्री. पाटील म्हणाले की, दीड लाख मराठा उद्योजक बनवण्याचे यश हे श्री. फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारचे आहे. मराठा समाजातील तरूण उद्योजक बनावेत या हेतूने मराठा तरुणांवर विश्वास टाकत १३ हजार कोटींचे कर्ज मराठा तरुणांना दिले गेले आहे. जवळपास १३०० कोटींचा व्याज परतावा अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून राज्य सरकारने दिला आहे. याचा अर्थ स्पष्ट आहे की, मराठा समाजातील युवक रोजगार निर्माण करत आहे. त्यातून घेतलेल्या कर्जाचा व्याज भरणा करून सरकारकडून अनुदान घेत आहेत. इतर समाजांप्रमाणेच मराठा विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या मिळायला हव्यात या हेतूने ''बार्टी'' च्या धर्तीवर सारथी महामंडळ स्थापन करण्यात आले. इतर महामंडळांशी तुलना केली तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाला सध्याच्या महायुती सरकारचे आणि आधीच्या शिंदे-फडणवीस सरकारचे पाठबळ असल्यामुळेच महामंडळाच्या माध्यमातून मराठा तरुणांना भरघोस मदत करता आली आहे असे श्री.




पाटील यांनी स्पष्ट केले.निजामाच्या काळात मराठवाड्यातील मराठा समाजाला ओबीसी किंवा कुणबी हा दर्जा होता आणि आरक्षण मिळायचे. ते अबाधित रहायला हवे. मराठवाड्यामध्ये सरसकट कुणबी प्रमाणपत्र देता आले तर बरे होईल. असे मत श्री. पाटील यांनी व्यक्त केले. यासाठी कायदेशीर बाजू समिती व तज्ज्ञांनी तपासायला हवी असेही ते म्हणाले . यंदाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळासाठी ७५० कोटींच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. मागच्या वर्षी महायुती सरकारने या महामंडळाला ३५० कोटी दिले तर यंदा पहिला हप्ताच तब्बल ३०० कोटींचा देण्यात आला आहे. त्यामुळे महामंडळाला मराठा समाजाच्या हितासाठी अधिकाधिक योजना आखता येणार आहेत. श्री.फडणवीस, श्री.शिंदे आणि अजित पवार यांनी मराठा समाजातील युवकांना उद्योजकतेची संधी देत भवितव्य बदलण्याचे बळ दिले आहे. मराठा समाजाने याचा विचार करावा आणि त्यानुसार कृती करावी असे आवाहन श्री. पाटील यांनी केले.श्री. पाटील म्हणाले की, महाराष्ट्रात मराठा समाजाचे १२ मुख्यमंत्री होऊन गेलेत,ज्यांनी मराठा समाजाच्या हातावर फुटकी कवडी देखील ठेवली नाही. मराठवाड्यात सर्वात जास्त मुख्यमंत्री होऊनही गरीबी का हटली नाही याबाबत काँग्रेसच्या सर्व माजी मुख्यमंत्र्यांनी आत्मचिंतन करायला हवे असा टोलाही त्यांनी लगावला.

**सर्वसामान्य लोकांना त्रास देऊन आंदोलन बदनाम करू नका**

मुख्यमंत्री फडणवीस, श्री.शिंदे, श्री.पवार यांचे महायुती सरकार, मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे पाटील हे मराठा समाजाच्या मागण्यांवर योग्य तोडगा काढतील यावर विश्वास ठेवा. आंदोलन करण्याचा सर्वांना अधिकार आहे मात्र शांततेने करत असलेल्या आंदोलनाला समाजकंटकांमुळे गालबोट लागू नये यासाठी सजग रहा. सर्वसामान्यांना त्रास होईल असे वर्तन नको अशी कळकळीची विनंती श्री. पाटील यांनी केली. २०१६ मध्ये राज्यभर प्रचंड संख्येने मराठा मूक मोर्चे निघूनही त्याचा एकाही सामान्य माणसाला त्रास झाला नाही याची आठवणही श्री. पाटील यांनी करून दिली .

# आर.पी.आय (आंबेडकर) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या वतीने गटविकास अधिकारी नागरगोजे यांचा सत्कार



**केज । प्रतिनिधी**

केज येथील पंचायत समिती कार्यालयातील गटविकास अधिकारी या पदाचा कार्यभार विठ्ठल नागरगोजे साहेब यांनी नुकताच स्वीकारला आहे.विठ्ठल नागरगोजे साहेब यांनी पंचायत समिती केज या पदाचा कार्यभार नुकताच स्वीकारल्या मुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) यापक्षाच्या पदाधिकारी यांच्या वतीने दि.०३ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांचा सत्कार करण्यात आला.या प्रसंगी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आंबेडकर) पक्षाचे मराठवाडा अध्यक्ष भगवंत (आप्पा)वायबसे, जिल्हा प्रसिद्धी प्रमुख बाळासाहेब जाधव, तालुकाअध्यक्ष आश्रुबा (दादा)खरात,तालुका संघटक नवनाथ सोनवणे,अमोल जगताप,इंगळे,महादेव केदार आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धेत आदित्य सूर्यवंशी प्रथम काळे

## बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात आज दि.३/९/२०२५ रोजी जिल्हा स्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.माधवराव फावडे तर प्रमुख अतिथी म्हणून वसंत पतसंस्थेचे चेअरमन सुरेश शिनगारे हे होते.यावक्तृत्व स्पर्धेत लोकनेते माजी आमदार स्व. बाबुरावजी आडसकर यांचे कार्य व कर्तृत्व या विषयावर विद्यार्थ्यांनी विचारमंथन केले.केज तालुक्यातील व शहरातील विविध विद्यालयांनी सहभाग नोंदविला.या स्पर्धेत शालेय गटातुन प्रथम स्वामी विवेकानंद विद्यामंदिर केज




चा आदित्य सुर्यवंशी प्रथम, छत्रपती शिवाजी विद्यालय आडस ची काळे जान्हवी द्वितीय तर जोगेश्वरी विद्यालय साखर कारखाना अंबाजोगाईची प्रियंका केकाण तृतीय तर रजत बोबडे उत्तेजनार्थ आला आहे.

महाविद्यालयीन गटातुन बाबुरावजी आडसकर महाविद्यालयाचा अशोक आचार्य प्रथम, सायली गायकवाड द्वितीय तर जोगदंड वैष्णवी तृतिय आलेली आहे.

या स्पर्धेसाठी परिक्षक म्हणून दोन्ही गटांसाठी डॉ.रामचंद्र केदार, डॉ.आशा बोबडे, डॉ.प्रकाश खुळे, डॉ.युवराज डोईफोडे, डॉ.बाबासाहेब हिरवे यांनी काम पाहिले. प्रास्ताविक डॉ.सुनिल राऊत,सुत्रसंचलन डॉ.प्रशांत क्षीरसागर तर आभारप्रदर्शन डॉ.आशा बोबडे यांनी केले.

# तांदुळवाडी-सफाळे घाटातील खड्ड्यांमुळे जीव धोक्यात - नागरिकांचा आक्रोश

**पालघर । प्रतिनिधी**

तांदुळवाडी-सफाळे घाटातील रस्त्यांची अवस्था दिवसेंदिवस अधिकच बिकट होत असून संपूर्ण घाटाचा रस्ता मोठ्या खड्ड्यांनी व्यापला आहे. त्यामुळे प्रवाशांचा जीव धोक्यात आला असून अपघातांची मालिका सुरू झाली आहे. या गंभीर समस्येकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा नागरिकांचा आरोप आहे. तर स्थानिक लोकप्रतिनिधी फक्त निवडणुकीच्या काळात मतांसाठी नागरिकांचा विचार करतात, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.



आज सकाळी उचवली गावाजवळील उतरणीवर दोन मोठे अपघात झाले. गणपती सणानिमित्त कोरे गावाकडे जाणाऱ्या एका दुचाकीस्वाराचे वाहन घसरून अपघात झाला, तर एका स्कूटीचे चाक तुटून ती रस्त्यावर कोसळल्याची धक्कादायक घटना घडली. या अपघातांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गणपतीसारख्या सणासुदीच्या काळातही अपघात वाढल्याने प्रवाशांना धोकादायक परिस्थितीत प्रवास करावा लागत आहे. सफाळे येथून हायवेकडे जाणारा हा घाटमार्ग हा एकमेव पर्याय असल्याने नागरिकांना खड्डेमय रस्ताच वापरावा लागत आहे.

स्थानिक ग्रामस्थांनी अनेकदा तक्रारी करूनही कोणतीही दखल घेतली गेली नसल्याचा आरोप करत संताप व्यक्त केला आहे. अशा बेफिकीर लोकप्रतिनिधींना सुबुद्धी दे,अशा शब्दांत ग्रामस्थांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे.

# शेतकऱ्यांच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणारे दोन लाचखोर जाळ्यात


## सचिन साळुंखे यांच्या कारवाईने शेतकऱ्यांचा आनंदोत्सव

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील कृषी विभागाचा भ्रष्टाचाराचा चेहरा पुन्हा उघड झाला आहे. शेतकऱ्यांच्या योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी थेट लाच मागणाऱ्या सहायक कृषी अधिकारी मनसीराम तुळशीराम चौरे व डाटा ऑपरेटर रिजवान शेख रशीद या दोघांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.

पन्हाळी पाडा (ता. साक्री) येथील एका शेतकऱ्याला प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेंतर्गत मिळणाऱ्या ९,००० पैकी तब्बल ५,००० लाच मागण्याचे धाडस या दोघांनी केले. मात्र, शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा खाण्याचा त्यांचा डाव उप पोलीस अधीक्षक सचिन साळुंखे यांच्या धडाकेबाज कारवाईत फसला.साळुंखे यांच्या





नेतृत्वाखालील पथकाने काळजीपूर्वक सापळा रचून या दोन्ही लाचखोरांना पकडले. या कारवाईत पद्मावती कलाल (निरीक्षक, सापळा पथक), यशवंत बोरसे, राजन कदम, मुकेश अहिरे, प्रविण मोरे, संतोष पावरा, मकरंद पाटील, रामदास बारेला, प्रविण पाटील, सागर शिर्के, प्रितेश चौधरी, रेश्मा परदेशी, सुधीर मोरे व जगदीश बडगुजर यांचा मोलाचा सहभाग होता.

या धाडसी कारवाईनंतर शेतकऱ्यांमध्ये आनंदाची लाट उसळली. शेतकरी म्हणाले, आमच्या घामाच्या पैशावर कुरघोडी करणाऱ्यांना शेवटी कायद्याच्या जाळ्यात अडकवलं. हा आमच्यासाठी खरा न्याय आहे.कृषी विभागातील या भ्रष्टाचारामुळे शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत झाला असला तरी लाचखोर अधिकाऱ्यांना शिक्षा व्हावी आणि अशी कारवाई कायम सुरू राहावी, अशी जोरदार मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# वाणगाव येथे पारंपारिक गवूरपूजनाचा जल्लोष

**पालघर । प्रतिनिधी**

पालघर तालुक्यातील वाणगाव येथे शिवसेना, युवा एल्गार आघाडी आणि झलकारीबाई महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने पारंपारिक गवूरपूजन उत्सव २०२५ मोठ्या उत्साहात पार पडला. ग्रामीण व आदिवासी समाजाचा मोठा जनसमुदाय या पारंपारिक सोहळ्यात सहभागी झाला. गावातील विवाहित महिलांनी जंगलातील इंदवी फुलाचे पूजन करून घरातील ओटीपासून चुलीपर्यंत लाल माती व तांदळाच्या पिठाचे ठसे उमटवून पारंपारिक गवूरची पूजा केली. नैवेद्य व फळे अर्पण करून देवीची प्रार्थना करण्यात आली. नागपंचमीपासून गौरीपूजनापर्यंत चालणाऱ्या गवूरी नाच-गीतांच्या परंपरेला यानिमित्त विशेष उजाळा मिळाला. उत्सवात गवूरी नृत्य, तारपा नृत्य तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले. महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग आणि तरुणाईचा उत्साह विशेष उल्लेखनीय ठरला. या प्रसंगी युवा एल्गार आघाडीचे संस्थापक अध्यक्ष तथा शिवसेना विधानसभा संघटक अँड. विराज गडग यांनी परंपरा व संस्कृती जपणे हे आपले कर्तव्य आहे,असे प्रतिपादन केले. शिवसेना जिल्हाध्यक्ष कुंदन संखे यांनी आदिवासी बांधवांच्या प्रश्नांसाठी पक्ष सदैव पाठीशी राहील, असे आश्वासन दिले. माजी आमदार अमित घोडा, माजी जि.प. अध्यक्षा वैदेही वाढान आणि आदिवासी सेवक पुरस्कार विजेते वसंत भसरा यांनी मार्गदर्शन करून उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी झलकारीबाई महिला बचत गटाने विशेष मेहनत घेतली. वाणगाव, वनई, वेती, सुर्यानगर, तवा, ओसरविरा, निकने, ऐना, गोवने, शिगाव, देदाले, चिंचणी, साये, वधना, गांजाड, रायतली, खांबाले, चंद्रनगर, मुंडवाली आदी गावांमधून आलेल्या महिला, कार्यकर्ते व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्साह दिला. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार मानून अँड. विराज गडग यांनी गवूरपूजनाच्या शुभेच्छा दिल्या.



# आरक्षणाच्या संरक्षणासाठी ओबीसी आक्रमक!

## ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची बेकायदेशीररित्या होत असलेली घुसखोरी थांबवा!

## सकळ ओबीसी समाजाच्या वतीने जिल्हाधिकारी बीड यांना निवेदन सादर

**बीड । प्रतिनिधी**

शासनाने एस.ई.बी. सी.च्या माध्यमातून मराठा समाजाला अगोदरच १०% आरक्षण दिलेले आहे. त्यामुळे ओबीसीमध्ये नव्याने धावलेल्या ५३ लाख नोंदी तात्काळ रद्द कराव्यात. न्या. शिंदे समिती पक्षपातीपणे काम करत आहे. त्यामुळे ही समिती बरखास्त करण्यात यावी. दि. ०२.०९.२०२६ रोजी काढलेला शासन निर्णय क्र. सीवीसी – २०२५ / प्र.क्र. १२९ हा तात्काळ रद्द करण्यात यावा या प्रमुख मागण्यांसाठी बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज बांधव आक्रमक झाला असून बुधवार दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी मोठ्या संख्येने एकत्रित येत ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाची बेकायदेशीररित्या होत असलेली घुसखोरी थांबविण्यात यावी याकरिता ओबीसी समाज बांधवांनी समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांच्या नेतृत्वाखाली आपल्या मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी बीड यांना सादर केले आहे.

याबाबत जिल्हाधिकारी बीड यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भारतीय राज्यघटनेने सामाजिक, आर्थिक दृष्ट्या पिडीत, वंचीत घटकांना आरक्षणाची तरतुद केली. ही करत असतांना घटनात्मकदृष्ट्या नेमलेल्या आयोगांच्या सर्वेक्षण आणि घटनात्मक तरतुदीनुसार समाजाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर असलेल्या घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मंडल आयोगाच्या तरतुदीनूसार इतर मागासवर्गीय घटकातील १२ बलुतेदार १८ अलुतेदार, दुर्बल, वंचीत, पिडीत व मागास घटकातील हजारो जातींना ओबीसी या प्रवर्गात समाविष्ट करण्यात आले. वर्षानुवर्ष प्रस्थापितांची गुलामी करत. या प्रवर्गातील अनेक जातीतील समुदाय जगलेला आहे. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर या प्रवर्गाला शिक्षण, प्रशासन आणि राजकारण यात लोकसंख्येच्या निम्या प्रमाणात म्हणजे २७% आरक्षण प्राप्त झाले. हजारो वर्षापासून प्रस्थापितांची चाकरी करण्यात गेलेल्या या समाजाला काही अंशी प्रतिनिधीत्व मिळत असतांनाच मनोज जरांगे यांच्या माध्यमातून बेकायदेशीररित्या बळाचा वापर करून घटनाबाहय आंदोलनाच्या माध्यमातून शासनावर दबावतंत्र वापरून ओबीसी आरक्षण संपवण्याचा एक कलमी कार्यक्रम महाराष्ट्रात सध्या चालू आहे. आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्ट्या प्रबळ असलेल्या मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गात समावेश करण्यासाठी शिंदे समितीच्या माध्यमातून ५९ लाख बोगस कुणबी नोंदीची घुसखोरी झाल्याने ओबीसी समाजात चिंतेचे, भितीचे व दहशतीचे वातावरण झाले आहे. गत काळात महाराष्ट्र बेकायदेशीर आंदोलनाने होरपळलेला आहे. यामुळे शासनाने दबावतंत्राला बळी पडून ५९ लाख नोंदीद्वारे मराठा समाजाला ओबीसीमध्ये आणून मोठ्या प्रमाणात ओबीसीवर अन्याय केला आहे. आता सध्या मुंबईमध्ये मनोज जरांगे यांच्या बेकायदेशीर आणि बळाचा वापर करून होत असलेल्या आंदोलनापुढे झुकून परत न्या. शिंदे समितीला मुदतवाढ देवून एक प्रकारे मुळ ओबीसी प्रवर्गातील दुर्बल घटकांना अस्तित्व नष्ट करण्याच्या प्रवृत्तीला शासन एक प्रकारे सहाय्य करत आहे. त्यामुळे सरकारने दबावाखाली न घेता घटनात्मक बाबीचा विचार करून ओबीसीमध्ये मराठा समाजाची होत असलेली घुसखोरी थांबवावी. अन्यथा ओबीसी प्रवर्गात अत्यंत अस्वस्थता आहे. जर आपण ओबीसीवर अन्याय केला तर ओबीसी प्रवर्ग सुद्धा रस्त्यावर उतरल्या शिवाय राहणार नाही याची नोंद घेवून ओबीसीच्या भावना समजून ओबीसी प्रवर्गात मराठा समाजाचा शिरकाव होण्यापासून रोखा, अन्यथा यामुळे अस्वस्थ ओबीसी समाज तीव्र आंदोलनाचा मार्ग अवलंबेल व त्यानंतर होणाऱ्या परिणामाची जबाबदारी शासनाधी असेल याची नोंद घ्यावी. असे निवेदन दिले आहे .या प्रसंगी परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, बंजारा समाजाचे नेते प्रा. पी. टी. चव्हाण, वंजारी कर्मचारी महासंघाचे बीड जिल्हाध्यक्ष मोहन आघाव, ऑल इंडिया मुस्लिम ऑर्गनायझेशनचे बीड जिल्हाध्यक्ष प्रा. रफिक बागवान, माळी महासंघाचे नेते प्रा. लक्ष्मण गुंजाळ, सोनार समाजाचे ड. संदीप बेदरे, सेवालाल सेनेचे संस्थापक अध्यक्ष बी. एम. पवार, वंजारी समाजाचे नेते माऊली शिरसट, केशव तांदळे, धनगर समाजाच्या नेत्या श्रीमती मीनाक्षीताई देवकते, श्रीमती मयुरी बांगर, श्रीमती संजीवनी राऊत, सुतार समाजाच्या किस्किंदाताई पांचाळ, समता परिषदेचे बीड शहराध्यक्ष निखिल शिंदे, युवा नेते नितीन राऊत, राजू महूवाले, शुभम राऊत, सावता काळे, दत्तात्रय गोंदणे, अजय राऊत, संतोष रासवे, माळी महासंघाचे धनंजय काळे, कान्हा मेत्रे, मंगेश जमदाडे, गणेश काळे, उत्तरेश्वर शेलार, अनिकेत जिरे, महेश राऊत, राहुल राऊत, कृष्णा राऊत, पिंकू कदम, अंकुश कदम, नवनाथ कदम, निखिल ढोरमारे, हर्षद राऊत, भागवत राऊत, शंकर राऊत, प्रकाश राऊत, उमेश साळुंखे, कुमार शिंदे, राणा गोरे, प्रदीप उगलमुगले, विलास राठोड, धनंजय रोकडे, हनुमान ढाकणे, दत्ता वाघ, अजय ढाकणे, केशव तांदळे, कानिफनाथ विघ्ने, दिनेश शेप, गोपाळ शिंगारे, जगन्नाथ खेत्री, ऋषिकेश रासवे, चक्रधर हिवरकर, शशी पुरी, दीपक राख, अशोक जाधव, सुमंत राऊत, संभाजी राऊत, नारायण साळुंखे, जालिंदर राऊत, नवनाथ कदम, प्रकाश राऊत, श्रीमती चंद्रकला बांगर, श्रीमती सुमन कटोर, श्रीमती उषा चव्हाण, श्रीमती जया राऊत, श्रीमती सुरेखा बिडवे, श्रीमती संगीता डोंबरे, श्रीमती रेखा शिंदे, श्रीमती साधना शिंदे, श्रीमती मनीषा ठोंबरे यांच्यासह ओबीसी समाजाचे प्रतिनिधित्व करणारे शेकडो ओबीसी बांधव, भगिनी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### हैद्राबाद गॅझेटियर शासन परिपत्रकाची होळी!

**यावेळी उपस्थित ओबीसी बंधू-भगिनीने गगनभेदी घोषणा देत जिल्हाधिकारी कार्यालय दुमदुमून सोडले होते. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हैद्राबाद गॅझेटियर शासन परिपत्रकाची होळी ओबीसी बांधवांनी केली. शासनाने ओबीसी समाजाच्या भावना समजून घेऊन तात्काळ सदरील शासन परिपत्रक रद्द करावे अन्यथा यापुढे ओबीसीचे राष्ट्रीय नेते ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या नेतृत्वाखाली तीव्र आंदोलन करण्यात येऊन वेळ पडल्यास मुंबई देखील जाम करण्यात येईल असा इशारा समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुभाष राऊत यांनी यावेळी दिला.**

## युवा क्रांती फाउंडेशन'चा अनोखा उपक्रम पोलीस मित्रांकडून गणेशोत्सवात विनामूल्य सेवा

**नंदुरबार । दिपक गोसावी**

युवा क्रांती फाउंडेशनने गणेश चतुर्थीपासून सुरू झालेल्या गणेशोत्सवात एक कौतुकास्पद आणि समाजोपयोगी उपक्रम राबवला आहे. या संस्थेने 'पोलीस मित्र' ही टीम तयार करून संपूर्ण महाराष्ट्रात गणेश मंडळांना आणि पोलिसांना विनामूल्य सेवा पुरवली. 'आपण समाजाचे काही देणे लागतो' या भावनेतून हे पोलीस मित्र गणेश चतुर्थीच्या मिरवणुकीपासून ते अनंत चतुर्दशीच्या विसर्जन मिरवणुकीपर्यंत सक्रियपणे कार्यरत आहेत. समाजात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी तळोदा शहरात पोलीस मित्रांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांनी गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी रस्ते मोकळे केले आणि



बाहेरील वाहनांना पर्यायी मार्गाने वळवले. मिरवणुकीला बंदोबस्त पुरवला आणि रस्त्यावर बॅरिकेड्स लावले. जेष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांच्या सुरक्षिततेची काळजी घेतली. या पोलीस मित्रांच्या मदतीमुळे पोलिसांवरील कामाचा ताण कमी झाला आणि मिरवणुका शांततेत पार पडल्या. तळोदा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजू लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम यशस्वी झाला. तळोदा पोलीस पाटील बापू पाटील यांनीही या कार्यात सक्रिय सहभाग घेतला. या टीममध्ये अनेक तरुणांनी सहभाग घेतला होता. या सर्व पोलीस मित्रांनी विसर्जन होईपर्यंत तळोदा शहरात आपली विनामूल्य सेवा बजावली. त्यांच्या या कार्याचे शहरातील नागरिकांनी खूप कौतुक केले असून, हा उपक्रम समाजात एक चांगला संदेश देत आहे.

## मराठा आंदोलकांचा श्री सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेच्या वतीने सत्काराचे आयोजन

**परळी । प्रतिनिधी**

मुंबई येथे संघर्षयोद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मराठा समाजाच्या आरक्षण लढ्यात महत्वपूर्ण योगदान देणाऱ्या मराठा सेवक आंदोलकांचा सत्कार आयोजित केला आहे.

परळी व पंचक्रोशीतील मराठा बांधव व त्यांना पाठिंबा म्हणून इतर समाजाचे बांधव मुंबईला मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आदोलनाला पाठिंबा जाहीर करण्यासाठी सहभागी झाले होते. ऊन्, पाऊस, वार याची पर्वा न करता आपल्या कुटुंबांच्या व पुढच्या पिठीच्या भविष्यासाठी मराठा बांधव लाखोच्या संख्येने आंदोलनात सहभागी



आले. संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांनी केलेल्या मागण्या महाराष्ट्र शासनाकडून पूर्ण मंजूर करून घेतलेल्या मराठा बांधव व मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला यश आले. आपली अस्मितेची लढाई आपल्या मराठा बांधवांनी लवुन जिंकली म्हणून श्री सप्तशृंगी दुर्गा सेवाभावी संस्थेच्या वतीने दि.०३/०९/२०२५ रोजी सायं. ६:०० वा. सप्तशृंगी सभागृह, माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख यांच्या घरासमोर, गणेशपार परळी वैजनाथ येथे भव्य सत्काराचे आयोजन करण्यात आले आहे.तरी मुंबईला आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व लढवण्या मराठा आंदोलकांनी उपस्थित रहावे असे आवाहन श्री सप्तशृंगी सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष दिपक नाना देशमुख यांनी केले आहे.

## जनतेच्या विश्वासाचा आधारवड दरेकर नाना

### आष्टी मतदारसंघाचा गौरव, बीड जिल्ह्याचे सर्वश्रेष्ठ नेतृत्व!



**आष्टी । रविंद्रनाथ ठाकूर**

आष्टी मतदारसंघाच्या राजकारणाचा पाया म्हणजे जनतेशी जिव्हाळ्याचं नातं. चार दशकांपासून हे नातं अढळ विश्वासाने,लोकसेवेच्या अखंड ध्यासाने आणि जनतेच्या सुख-दुःखात सदैव धावून जाणाऱ्या एका व्यक्तिमत्त्वाने जिवंत ठेवलं आहे. ते व्यक्तिमत्त्व म्हणजेच आष्टीच्या राजकारणाचे भीष्मपितामह,माजी आमदार मा.श्री.साहेबरावजी दरेकर (नाना). ३ सप्टेंबर १९४७ रोजी कोयाळच्या शेतकरी कुटुंबात जन्मलेले नाना लहानपणा पासूनच सामाजिक भान घेऊन पुढे सरसावले. पिंपळा जिल्हा परिषद गटातून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास कडा सहकारी साखर कारखान्याच्या संघर्षापर्यंत पोहोचला आणि तिथूनच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा बुलंद आवाज बनून त्यांनी 'शेतकऱ्यांचे तारणहार' म्हणून ओळख निर्माण केली. भीमराव धोंडे साहेबांच्या खांद्याला खांदा लावून लढताना त्यांचे नेतृत्व लोकांच्या मनावर कोरलं गेलं.१९९५ मध्ये मुलगा-मुलगी चिन्हावर विक्रमी मते घेऊन विधानसभेत पोहोचताना आष्टीकरांनी आपल्या नायकाला भरभरून साथ दिली. त्यांच्या कार्यकाळात रस्ते, पूल, तलाव, आयटीआय महाविद्यालय यांसारखी शेकडो विकासकामे उभी राहिली. नेहमी मदतीला तत्पर हा त्यांचा जीवनमंत्र असून सुरेश आण्णा धस, बाळासाहेब आजबे यांसारख्या अनेक नेत्यांना घडवण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे.आजच्या बदलत्या राजकीय वाऱ्यांतही नाना निष्ठेने राष्ट्रवादी काँग्रेसच्या विचारांशी जोडलेले असून मा. शरद पवार साहेबांवरील ठाम विश्वासाने कार्यरत आहेत. त्यांचा स्वाभिमानी बाणा, परखडपणा आणि जनतेशी सहजसुलभ संवाद साधण्याची शैली हेच त्यांच्या लोकप्रियतेचे खरे गमक आहे .

## बेटकबिलोली येथील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे पंचनामे

**नायगाव । प्रतिनिधी**

नांदेडच्या नायगाव तालुक्यातील २८ ऑगस्ट रोजी झालेल्या ढगफुटी सदृश पावसाने हजारो हेक्टर क्षेत्रावरील पुराने पिके ही पाण्याखाली गेलेली आहेत तर अनेकांच्या घराघरात पाणी घुसून कोट्यावधीत नुकसान झालं आहे झालेल्या नुकसान चे प्रशासनाने महसूल विभागाच्या वतीने शेती पिकांचे पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे आज दिनांक ३ सप्टेंबर रोजी तालुक्यातील बेटकबिलोली येथे उपविभागीय अधिकारी क्रांती डोंबे



तहसीलदार धम्मप्रिया गायकवाड यांच्या आदेशानुसार तलाठी श्याम मुंडे , ग्रामसेवक पवळे, महागावकर मॅडम कृषी सहायक सरपंच प्रतिनिधी राहुल पाटील नकाते, पोलीस पाटील भागवत भुताळे चेअरमन श्री संभाजी पाटील पवार शेतकरी साईनाथ नकाते, लक्ष्मण भरकाड, गंगाधर पवार गणपत पवार,किशन भरकाड, सचिन पवार,माधव पवार,बाळू मोरे सुभाष पवार ,राजेश पवार ,शिवकुमार नकाते ,अविनाश पवार शिवदास कुराडे यासह पूरग्रस्त शेतकरी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते तलाठी व कृषी सहाय्यकाच्या साह्याने प्रत्येकाच्या थेट बांधावर जाऊन शेती पिकांची नुकसानीचे पंचनामे केले यावेळी शेतकऱ्यांनी लवकरात लवकर मदत मिळावी अशी विनंती प्रशासनाकडे केली आहे.

## केज तालुक्यातील वरपगाव ग्रामस्थांचा भव्य कॅन्डलमार्च संपन्न

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील वरपगाव येथे मंगळवारी सायंकाळी मराठासेवक सतीश ज्ञानोबा देशमुख यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी गावातून कॅन्डलमार्च काढण्यात आला.वरपगावच्या सतीश देशमुख यांचा मुंबई आंदोलनात सहभागी होऊन जात असताना शिवनेरी मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी सकाळी प्रवासा दरम्यान रक्तदाब वाढल्याने मृत्यू झाला होता.त्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी या घटनेवर दुःख व्यक्त केले होते.त्यांनी




कुटुंबा प्रती संवेदना व्यक्त करून सतीश देशमुख यांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही असे म्हटले होते.आम्ही यशस्वी होऊनच परत येऊ असा आत्मविश्वास व निर्धार व्यक्त केला होता.आंदोलन संपल्या नंतर वरपगाव येथे जाऊन सतीश देशमुख यांच्या परिवाराची भेट घेणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.मंगळवारी शासनाने मागण्या मान्य करताच वरपगावच्या ग्रामस्थानी सायंकाळी ७ वाजता गावातून भव्य कँडलमार्च चे आयोजन केले.यावेळी 'भारत माता की जय, जय जिजाऊ जय शिवराय,मनोज दादा तुम आगे बढो,वंदे मातरम्,सतीश देशमुख अमर रहे,अमर रहे! यासारख्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.त्यानंतर गावच्या हनुमान मंदिर परिसरात काही वक्त्यांनी भाषणे झाली व राष्ट्रगीताने कार्यक्रम संपला. यावेळी गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077